महाराष्ट्र विधानपरिषद

दिवसाच्या कामकाजाचा क्रम

बुधवार, दिनांक २७ जुलै, २०१६

(सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये -

(सोमवार, दिनांक १८ जुलै, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) — (अनुक्रमांक १ व २) -

(१) **श्री.जयंत पाटील, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"दिनांक १ जानेवारी, २०१६ ते १० एप्रिल, २०१६ या १०० दिवसांमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या ९ हजार १८१ टँकरद्वारे तर खासगी ३८ हजार ९९९ टँकरद्वारे मुंबई शहरात पाणीपुरवठा झालेला असणे, मानखुर्द, देवनार, गोवंडी या परिसरात महानगरपालिकेकडून ९१५ तर खाजगी १३ हजार ४२४ टँकरनी पाणी पुरवठा करण्यात येणे, घाटकोपर, अंधेरी, बोरिवली पश्चिम, परळ या विभागातही महानगरपालिकेच्या टँकरपेक्षा खाजगी टँकरचे प्रमाण अधिक असल्याचे महानगरपालिकेच्या आकडेवारीवरुन दिसून येणे, महानगरपालिकेकडे असलेले टँकर हे अग्निशमन, रुग्णालय अशा अत्यावश्यक सेवांसाठी वापरले जात असणे, त्यामुळे महानगरपालिकेच्या ज्या ग्राहकांना पुरेसा पाणी पुरवठा होत नाही त्यांनी खाजगी टँकर आणल्यास अधिकृत बिल पाहून पाणी दिले जात असल्याचे महानगरपालिकेतील जल विभागातील अधिकाऱ्यांचे म्हणणे असणे, मात्र हे पाणी नेमके लाभार्थीनाच मिळते का, याबाबतचा तपास करण्याची कोणतीही यंत्रणा महानगरपालिकेकडे नसणे, या कारणास्तव महापालिकेच्या पाण्यावर टँकर माफियांचा फायदा होत असणे, याबाबत शासनाने चौकशी करून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई महानगरपालिका क्षेत्रात विकास कामे करणारे जे कंत्राटदार त्यांनी केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे काळया यादीत टाकण्यात आले असणे, असे ठेकेदार आजमितीस कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात निविदा भरुन विकास कामे करत असले तरी येथेही त्यांच्याकडून कामांचा बोजवारा उडालेला असणे, त्यामध्ये प्रामुख्याने रेल्कॉन इन्फ्रा, आर. के. मधानी, आर. पी. एस इन्फ्रा यांचा समावेश असणे, या कंत्राटदाराकडून कामाचा दर्जा न राखता मनमानी होत असताना, महापालिका प्रशासन राजकीय दबावापोटी ही मनमानी सहन करत असल्याने जनतेच्या पैशांचा

अपव्यय होत असणे, त्यामुळे काळया यादीतील कंत्राटदारांना काही मर्यादित कालावधीसाठी एम.एम.आर. क्षेत्रात निविदा भरुन काम न करण्याबाबत प्रतिबंध घालण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने चौकशी करून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) — (अनुक्रमांक ३ व ४) -

(३) **श्री.विक्रम काळे, वि.प.स.**

"टेंभुर्णी ते लातूर व तुळजापूर-लातूर-नांदेड या रस्त्यांच्या चौपदीकरणाबाबत" या विषयावरील **श्री. विक्रम काळे व इतर वि.प.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक **१८७४५** ला दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(४) **प्रा.अनिल सोले, वि.प.स.**

"चंद्रपूर जिल्हा परिषद कृषी विभागअंतर्गत शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेल्या लोखंडी बंड्या ह्या कमी वजनाच्या व निकृष्ठ दर्जाच्या असल्याबाबत" या विषयावरील **श्रीमती शोभाताई फडणवीस, माजी वि.प.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक **१११०३** ला दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(बुधवार, दिनांक २० जुलै, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) — (अनुक्रमांक ५ व ६) -

(५) **प्रा.अनिल सोले, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील अनुसूचित जाती व जमातीतील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी कृषि विभागाद्वारे सन १९८२ पासून विशेष घटक योजना राबविण्यात येत असणे, सदर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर शेती अवजारे, बैलजोडी, इनवेल बोअरींग, पाईप लाईन, विहिर, पंपसंच, शेततळे, तुषार सिंचन इत्यादी शेती अवजारे व साहित्य पुरविण्यात येणे, परंतु सदर साहित्य सद्यःस्थितीत महागडे झाले असून उक्त योजनेच्या अनुदानात वाढ न झाल्यामुळे शेतकऱ्यांना अवजारे व साहित्य विकत घेणे अशक्य झाले आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमध्ये काम करतांना स्वखर्चाने काम करावे लागत असणे, त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला असणे, त्यामुळे विशेष घटक योजनेच्या अनुदानात वाढ करण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

(६) **श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"आर्णी (जि.यवतमाळ) हे तालुक्याचे व बाजारपेठेचे गाव असून सद्य:ठिकाणी बसस्थानक सुस्थितीत नसणे, सदर गावात बसस्थानक उभारण्याची मागणी वीस वर्षापासून केलेली असूनही अद्याप बसस्थानक उभारण्यात न येणे, १२० गावातील नागरीक व विद्यार्थी, शासकीय कामे, शिक्षण व वैयक्तिक कामाकरीता व बाजारासाठी येत असतांना मात्र बसस्थानकामध्ये कुठल्याही प्रकारची सोय नसल्याने नागरीकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

(गुरुवार, दिनांक २१ जुलै, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) — (अनुक्रमांक ७ व ८) -

(७) **श्री. अनिल भोसले, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पुणे शहरातील पवना व मुळा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात जलपर्णी साचली असणे, तसेच येथील अस्वच्छतेमुळे डासांचा उपद्रव वाढला असणे, पर्यायाने नदीपात्राशेजारी राहणाऱ्या नागरिकांना विविध आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत असणे, महापालिका प्रशासनातर्फे दरवर्षी जलपर्णी काढण्याचे काम हाती घेतले जात असणे, मात्र ऐन पावसाळ्याच्या तोंडावर हे काम सुरु करण्यात येणे, पाऊस पडला की नदीपात्रातील जलपर्णी वाहून जात असणे, तथापि, या कामांसाठी दरवर्षी लाखो रुपये कंत्राटदाराला दिले जात असणे, जलपर्णी दरवर्षी हिवाळ्यात सदर नदीपात्रात वाढत असणे, प्रशासनाकडून सदरील जलपर्णी काढण्यासाठी निविदा मागविली जात असणे, सदर निविदा मंजूर होईपर्यंत उन्हाळा संपून पावसाळा येत असणे, जलपर्णी योग्यवेळी समूळ नष्ट करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने चौकशी करून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्री. रामनाथ मोते, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये पायाभूतपेक्षा शिक्षक शिक्षकेत्तरांच्या पदांमध्ये वाढ झाल्याने वाढीव पदांना शासनाची मान्यता घेणे शासनाने बंधनकारक करणे, वाढीव पदांना वेळेवर मान्यता न मिळणे, माध्यमिक विभागाची सन २००० ते २००८ पर्यंतची सुमारे १७०३ पदे आजही मंजूरीसाठी शासनाकडे प्रलंबित असणे, उच्च माध्यमिकची सन २००८-०९ ते २०१०-११ पर्यंतची ९३४ वाढीव पदे मे, २०१४ मध्ये मंजूर करणे पण त्या पदांवर काम करणाऱ्यांना मान्यता दिनांकापासून वेतन न

देणे, सन २०११-१२ ते २०१४-१५ अखेरची उच्च माध्यमिकची वाढीव पदे मान्यतेसाठी प्रलंबित असणे, वेळेवर मान्यता न मिळाल्याने शिक्षकांना वेतनापासून वंचित ठेवणे, याबाबत शासनाकडून जाणीवपूर्वक विलंब होत असून अधिकारी शासनाचा निधी वाचविण्याचा प्रयत्न करीत असणे, पायाभूतपेक्षा वाढीव पदांना तातडीने मान्यता मिळण्याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची उपाययोजना."

(सोमवार, दिनांक २५ जुलै, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) — (अनुक्रमांक ९ व १०) -

(९) श्री. हेमंत टकले, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

वाढत्या ताणतणावामुळे राज्यात विद्यार्थ्यांपासून वृध्दांपर्यंत मानसिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होणे, राज्यातील २३ जिल्हा रुग्णालये आणि चार मनोरुग्णालयात मानसिक विकारतज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त नसणे, तसेच मनोरुग्णांसाठी आवश्यक असलेली क्लिनिक, सॉयकॉलॉजिस्टची पदे रद्द करण्यात आल्यामुळे जिल्हा रुग्णालयात क्लिनिक सायकॉलॉजिस्ट उपलब्ध नसणे, परिचारीकांची व रुग्णांसाठी जेवण बनविणाऱ्यांची पदे रिक्त आहेत, तसेच रुग्णालय अधिक्षकांची पदे रिक्त असून त्यातील तीन पदाचा कारभार हंगामी अधिक्षकामार्फत चालविण्यात येत आहे. यामुळे रुग्णांची होणारी गैरसोय तसेच राज्यातील मनोरुग्णालयात क्षमतेपेक्षा जास्त रुग्णांना ठेवण्यात येत असल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील वनक्षेत्रात वनस्पती व वन्य जीव यांचे भरपूर प्रमाण असणे, कायद्यानुसार वनक्षेत्रातील कोणत्याही वनस्पती व वन्य जीवांना संशोधनासाठी वनाबाहेर प्रयोग शाळेत नेण्यासाठी राज्य जैव विविधता मंडळाची परवानगी घेणे बंधनकारक असणे, आयुर्वेद कंपन्यांसह परदेशातील नामवंत औषध कंपन्यांनी त्यांच्या प्रयोगशाळेत अवैधरित्या वनऔषधी व वन्यजीव विनापरवाना नेणे, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता."

(दुपारी १२.०० वाजता)

एक : (क) प्रश्नोत्तरे.

(ख) अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी व तिसरी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

दोन : "लोकलेखा समितीचा अकरावा अहवाल सादर करणे."

तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — असल्यास.

(ख) म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने — असल्यास.

चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -

(१) **श्री. गोपीकिशन बाजोरिया वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अकोला महानगरपालिका दिनांक १ ऑक्टोबर, २००१ ला अस्तित्वात येणे, अकोला महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर पालिकेचा सर्वच खर्च भागविण्याकरिता शासनाने भरघोस निधीची / खर्चाची तरतूद करणे गरजेचे असूनही शासनाकडून यासंदर्भात ठोस कार्यवाही न झाल्याने सद्यस्थितीत अकोला महानगरपालिकेचा कारभार आर्थिक संकटात असणे, शासनाने नविन महानगरपालिका अस्तित्वात आल्या तेव्हा त्यांना भरीव निधी दिलेला असणे परंतु अकोला महानगरपालिकेवर निधी न दिल्यामुळे झालेला अन्याय, अकोला महानगरपालिकेला केंद्र शासनाकडून भूमिगत गटार योजना, एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधारणा योजना, रमाई योजना, आदि विविध योजनांकरिता येणारे अनुदान विहित मुदतीत प्राप्त होत असणे, परंतु शासनाकडून उपलब्ध होणारे अनुदान वेळेत उपलब्ध होत नसल्याने महानगरपालिकेचा कारभार अडचणीत येणे, पालिकेची स्वतंत्र पाणी पुरवठा योजना अस्तित्वात नसल्याने दर एक दिवसाआड पाणी पुरवठा केला जाणे, पालिकेतील कर्मचाऱ्यांना वेळेत वेतन न मिळाल्यामुळे तीन-चार कर्मचाऱ्यांनी आर्थिक विवंचनेमुळे केलेल्या आत्महत्या, कार्यालयीन कामकाजाकरिता निधीची तरतुद नसल्याने अनेक कामे प्रलंबित राहणे, तसेच "ड" वर्ग महानगरपालिकेचे विकास नियंत्रण नियमावली तयार न झाल्यामुळे गेल्या चार वर्षापासून महानगरपालिकेतील क्षेत्रातील अनेक बांधकामे रखडलेली असणे, अकोला महानगरपालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे अकोला वासियांमध्ये प्रचंड नाराजी / असंतोषाचे वातावरण पसरणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची नितांत आवश्यकता, याकरिता शासनाने अकोला महानगरपालिकेला भरीव निधी देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(२) **सर्वश्री. नारायण राणे,** संजय दत्त, किरण पावसकर, धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. नरेंद्र पाटील, हेमंत टकले, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. आनंद ठाकूर, प्रकाश गजभिये, ख्वाजा बेग, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येणाऱ्या कोटयवधी रुपयांच्या रस्ते कामात कंत्राटदार, पालिकेतील उच्चपदस्थ अधिकारी यांच्या

संगनमताने घोटाळा झाल्याची उघडकीस आलेली बाब, मागील ३ वर्षात ९००० कोटीचा भ्रष्टाचार झाला असून यावर्षी ३५२ कोटी रुपयांचा रस्ते कामातील गैरव्यवहार फक्त १४ कोटींचा दाखविण्याचा झालेला प्रयत्न, कंत्राटदारांना पाठीशी घालून लेखापालांसारख्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांना झालेली अटक, मुंबईत कोणत्याही रस्त्याचे काम ठरवून दिलेल्या मापदंडानुसार झालेले नसणे, त्यात सरासरी ५३ टक्के अनियमितता असल्याचा गंभीर ठपका मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास ठेवणे, या संदर्भातील चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी समिती स्थापन करण्यात येऊन या समितीने अहवाल मुंबईच्या महापौरांकडे सादर करणे, सन २०१५-१६ दरम्यान झालेल्या रस्त्यांच्या कामामध्ये मालाड रिझर्ववर रोड (पी वॉर्ड), खडकपाडा रोड, गुरु गोविंदसिंग रोड (k वॉर्ड) वासरी हिल रोड (पी-दक्षिण), जयचंद कारवा रोड (पी-दक्षिण) इत्यादी रस्ते चाचणीमध्ये कमी दर्जाचे साहित्य वापरुन बनविले असल्याचे निदर्शनास येणे, या निकृष्ट दर्जाच्या कामांमध्ये आर.पी.एस. इंफ्राप्रोजेक्टस, आर.के.मधानी व महावीर इंन्फ्रास्ट्रक्चर इ. कंपन्या दोषी असल्याचे आढळून येणे, अद्याप दोनशे रस्त्यांची चाचणी परिक्षा बाकी असणे, सदर रस्त्यांच्या कामांमध्ये अतिशय कमी दर्जाचे साहित्य वापरणे, नियमावलीचे तंतोतत पालन न करणे, रस्त्यांच्या कामाच्या ठेकेवाटपातील अनियिमितता, याद्वारे सुमारे रु.१५० करोडपेक्षा जास्त रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे आढळून येणे, रस्ते कामात झालेल्या गैरकारभाराबाबत मुंबई महानगर पालिका प्रशासन व दोन्ही सत्तारुढ पक्ष जाणूनबूजुन करीत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे मुंबई शहरातील नागरिकांत पसरलेली तीव्र नाराजीची व असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन मुंबई महानगर पालिकेच्या गलथान कारभाराबाबत चौकशी करुन याप्रकरणी दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. चंद्रकांत रघुवंशी,** अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नंदुरबार तालुक्यातील सुदंर्दे येथे पंचायत समितीच्या सभापती निवडीच्या वादातून दिनांक १४ जुलै, २०१६ रोजी माजी आमदार व त्यांच्या साथीदारांनी नवनिर्वाचित सभापती यांचे नातेवाईकांना जबर मारहाण करुन त्यांना जीवे मारण्याची धमकी देणे, आदिवासी समाजाच्या महिला सभापती यांना त्रास देण्याच्या हेतूने काही समाजकंटकांकडून केबल टिव्हीच्या कनेक्शनचे वायर रोज रात्रीच्या वेळी तोडण्यात येऊन मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात येणे, याबाबतची तक्रार स्थानिक पोलीस स्टेशनला देऊनही या प्रकरणातील दोषींवर कोणतीच कारवाई करण्यात न येणे,

याउलट त्याचा राग ठेऊन संबंधित विरोधकांनी सभापती यांच्या नातेवाईकांना मारहाण करणे, सभापती निवडीमुळे विरोधक त्यांच्यावर राग ठेऊन मोठ्या प्रमाणात त्यांना नाहक त्रास व नुकसान करण्याच्या हेतूने असे प्रकार करीत असल्याने स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, या प्रकरणी राज्य शासनाने सखोल चौकशी करुन परिसरातील कायदा व सुव्यवस्था वेशीवर टांगणाऱ्या दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री.संदिप बाजोरिया,** अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री.हेमंत टकले, किरण पावसकर, आनंद ठाकूर, नागो गाणार, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक ३० जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास यवतमाळ येथील (जि.यवतमाळ) पब्लिक स्कूल या शाळेत ४ अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघडकीस येणे, त्यामुळे तेथील नागरीकांत व पालक वर्गात पसरलेला तीव्र असंतोष, संबंधित शिक्षकांविरुध्द कारवाई करण्याबाबत तेथील नागरीकांनी आंदोलने करुन सुध्दा पोलीसांचे त्याकडे झालेले दुर्लक्ष, दिनांक ३ जुलै, २०१६ रोजी तेथील नागरीकांनी संबंधित शिक्षकांना अटक करण्यासाठी मोर्च्याचे आयोजन केले असता पोलीसांनी सनदशीर मार्गाने आंदोलन करणाऱ्या जमावावर केलेला लाठीहल्ला तसेच हवेत केलेला गोळीबार, त्यामुळे यवतमाळ शहरात कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून संबंधित शिक्षकांना त्वरीत अटक करुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. संजय दत्त,** अनिल भोसले, नरेंद्र पाटील, संदिप बाजोरिया, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित, सुनिल तटकरे, हेमंत टकले, सतिश चव्हाण, जयवंतराव जाधव, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यशासनाने जसलोक, ब्रीच कॅन्डी, बॉम्बे हॉस्पिटल, लिलावती, हरकिसनदास, नानावटी, हिंदुजा अशा अनेक खाजगी धर्मादाय रुग्णालयांना माफक दरात जागा दिलेली असणे, त्याबदल्यात त्यांच्यावर घालण्यात आलेल्या अटीनुसार गरीब रुग्णांना सवलतीच्या दरात आरोग्य सुविधा पुरविण्याची त्यांच्यावर जबाबदारी असणे, सदरील धर्मादाय रुग्णालयांबाबत वारंवार तक्रारी येऊ लागल्याने शासनाने शासननिर्णय जारी करुन त्याद्वारे २३ आरोग्यसेवकांची नियुक्ती करुन गरिबांना पुरेश्या आरोग्यसुविधा अटीनुसार पुरविल्या जातात कि नाही हे पाहण्याचे काम दिलेले असणे, नियमानुसार सदर रुग्णालयांना एकूण खाटांच्या (बेडसच्या) २० टक्के बेड गरिब रुग्णांसाठी आरक्षित ठेवणे बंधनकारक असणे, परंतु सदर रुग्णालये

नियम तोडून कागदोपत्री पुरावे न ठेवून आरक्षित बेडची सुविधा इतर रुग्णांना पुरवित असणे, यामध्ये कागदोपत्री खोटा रिपोर्ट करत असल्याचे आढळून येणे. मा. मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारचा गैरव्यवहार रोखण्याच्या दृष्टिने रुग्णांचे रेशन कार्ड तसेच दारिद्ररेषेखाली असल्याचा पुरावा ऑनलाईन तपासण्याचे सॉफ्टवेअर तयार करण्याच्या संबंधितांना सूचना दिलेल्या असणे, सदर रुग्णालयांत चाललेल्या अनागोंदी कारभारावर वचक ठेवण्याच्यादृष्टिने नियुक्त केल्या गेलेल्या या आरोग्य सेवकांच्या कामामध्ये संदिग्धता आढळून आल्याने या आरोग्यसेवकांना मे-२०१६ दरम्यान रुग्णालयात माहिती पुरविण्यास नकार देण्यात आलेला असणे, यामुळे शासन निर्णय जारी करुन देखील सदर रुग्णालये शासनास दाद देत नसल्याचे आढळून आल्याने राज्यातील रुग्णांमध्ये व जनमानसात पसरलेली चिडीची व असंतोषाची भावना, याकरिता धर्मादाय रुग्णालयांकडून गरिब रुग्णांची होत असलेली फसवणूक रोखण्याबाबत व सदरील रुग्णालयांच्या गैरव्यवहाराबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोकणातील रायगड जिल्हा एक प्रमुख फलोत्पादन जिल्हा असणे, रायगड जिल्ह्यात आंबा, काजु, चिकू, नारळ व फुलशेतीची मोठ्या प्रमाणात लागवड झाली असल्याने जिल्ह्यात शेतकऱ्यांना शेती हे एक उदरनिर्वाहचे प्रमुख साधन असणे, रायगड जिल्ह्यात फळबाग लागवडी योग्य जमीनी मोठ्या प्रमाणात असणे, त्यामुळे जमीनीचे भाव मोठ्या प्रमाणात वाढलेले असणे, जमीनीच्या वाढलेल्या भावामुळे मोकळ्या व ओसाड असणाऱ्या जमिनीवर स्थानिक भू-माफीयांनी दलालांच्या संमतीने मोठ्या प्रमाणावर जमीनीची विक्री केलेली असणे, तळा, जि.रायगड येथील हजारो एकर सरकारी जमीन शासकीय अधिकारी व स्थानिक भू-माफीया दलालांच्या संमतीने विक्री केलेली असणे, मौजे.पढवण, ता.तळा येथील बऱ्याचशा सातबारा उताऱ्यावरील सरकारी आकारी पड या नोंदी कमी करून दरसाल कबुलायतदार होत या नोंदी दलालांच्या संगनमताने घेतल्या गेलेल्या असणे, १९५६ पासूनच्या सरकारी आकारी पड असणाऱ्या या जमीनींची बेकायदेशीररित्या विक्री करून शासनाची फसवणूक केलेली असणे, यामुळे शासनाचा हजारो कोटी रुपयांचा महसूल बुडाला असणे, या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी माहिती अधिकारांतर्गत माहिती मागवली असताना सुद्धा अनेक आदेशांच्या नस्ती तहसिल कार्यालयातून गायब होऊन २१ आदेशांपैकी फक्त ६ आदेशांच्याच नोंदी दप्तरी दिसून येत असणे, पढवण गावाप्रमाणेच तालुक्यातील इतर गावांमध्ये देखील शासकीय जमीनीची विल्हेवाट लावल्याच्या अनेक तक्रारी दाखल झालेल्या असणे, या प्रकरणात गुंतलेले भूमाफिया हे सत्ताधारी पक्षाचे स्थानिक पदाधिकारी असल्याने

कागदपत्रे गहाळ होणे, प्रकरणांची चौकशी न होणे, यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला प्रचंड असंतोष, शेतकऱ्यांच्या जमिनी बेकायदेशीररित्या विकून शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या भूमाफियांवर व अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याबरोबरच सी. बी. आय. द्वारे चौकशी करण्याची होत असलेली मागणी व यावर शासनाची भूमिका."

(७) **श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाच्या महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळामार्फत सन २०१५ मध्ये केवळ विकलागांसाठी काढण्यात आलेल्या घरांच्या सोडतीत कांदिवली शिंपोली येथील उच्च उत्पन्न गटातील म्हाडाच्या ०१/ए या इमारतीतील १०१ क्रमांकाच्या सदनिकेसाठी कळव्यात राहणारे व शासनाच्या सेवेत असलेले विकलांग दाम्पत्य श्री. दिनेश गोविंद पाटील यांचा नंबर लागणे, दिनांक १२ मे, २०१६ रोजी ताबा पत्र घेण्यासाठी म्हाडाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून म्हाडा मुख्यालयात त्यांना बोलविण्यात येणे, सदर सदनिकेसाठी तब्बल ७० लाख भरल्यानंतर त्यांना घराची चावी प्राप्त होणे, घरात प्रवेश केल्यानंतर सोडतीत मिळालेली सदनिका अत्यंत गलीच्छ टॉयलेट, तुटके वॉश बेसिन, जागोजागी गळतीने खराब झालेले छत व भिंती अशा अवस्थेतील असणे, सदनिकेचे विकलांग दाम्पत्यांना सोडतीच्या माध्यमातून वाटप करून त्यांची शासनाकडून करण्यात आलेली फसवणूक, याबाबत, त्यांनी संबंधित छायाचित्रांसह म्हाडाचे मुख्याधिकारी यांच्याकडे दिनांक २३ मे, २०१६ रोजी लेखी निवेदन दिल्यानंतर ही म्हाडाकडून याबाबतीत काहीच कार्यवाही न होणे, याबाबत शासनाकडून तातडीने करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

(८) **श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अनेक वर्षांपासून विविध संघटना, पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तसेच महिला संघटनांनी वेळोवेळी राज्यभर दारुबंदीसाठी आंदोलन करण्यात येणे व महिलांचा दारुबंदीसाठी आग्रह असणे, देशातील गुजरात, केरळ, आंध्रप्रदेश, हरियाणा, बिहार, तामिळनाडू, मिझोरम, नागालँड, मणिपूर राज्यात दारुबंदी झाल्याने महाराष्ट्र राज्यातही दारुबंदी करण्याची मागणी वारंवार होणे, महाराष्ट्र राज्यात वर्धा जिल्ह्यात पूर्णपणे दारुबंदी असताना गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातही दारुबंदी झाल्याने अनेक कुटुंब दारुमुळे उद्ध्वस्त होण्यापासून वाचली तर तरुण पिढी दारुसारख्या मोठ्या नशेच्या आहारी जाण्यापासून वाचल्याने तेथील जनतेत आनंदाचे वातावरण निर्माण होणे, राज्यातील वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली मागोमाग संपूर्ण राज्य दारुमुक्त करुन राज्यातील करोडो कुटुंब व तरुणांना दारुसारख्या भयंकर नशेपासून दूर करण्याची मागणी राज्यातील जनतेतून होणे, तरीही दारुबंदीकडे सरकारने दुर्लक्ष करणे, त्यामुळे वेळप्रसंगी

समाजामध्ये तसेच माणसा-माणसांमध्ये होत असलेले कलह, दारुच्या नशेमुळे होणारी हाणामारी तसेच तरुण पिढी, शालेय विद्यार्थी यांच्यामध्ये दारुचे व्यसनात होणारी प्रचंड वाढ, दारुच्या अतिसेवनाने जीवन उध्दवस्त होणे, तर सैराट सारख्या व अनेक चित्रपटामध्ये दाखविण्यात आलेल्या अश्लिल दृश्यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये होणारे बदल व त्यातुन होणारे ऑनरकिलिंग, खून, बलात्कार, दरोडे, विनयभंग, महिलांवर क्रूर अत्याचार, आत्महत्या, विषारी दारुमुळे होणारे मृत्यू, विष पिऊन आत्महत्या करणे, राज्यात फक्त २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, ३० जानेवारी, शहिददिन, १ मे, महाराष्ट्र दिन, २ ऑक्टोबर, आषाढी व कार्तिकी-एकादशी निमित्त शासनातर्फे संपूर्ण दिवस दारुबंदी ठेवण्यात येणे, तरीसुध्दा गैरमार्गाने दारुची मोठ्या प्रमाणात विक्री होणे, सर्वसामान्यांकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, बुध्दजयंती, ईद मिलादुनब्बी, महावीर जयंती, रामनवमी, ख्रिसमस, गुरुनानक जयंती, अण्णाभाऊ साठे जयंती या दिवशी ड्रायडे ठेवण्याची मागणी होत असणे, राज्यात उत्पादन शुल्क अधिकारी यांच्याकडे वरील दिवशी ड्रायडे ठेवण्याबाबत निवेदन देणे, त्यांच्या माध्यमातून, जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून राज्य शासनाकडे या मागणीचा प्रस्ताव पाठविणे व महाराष्ट्र प्रोव्हेबिशन ॲक्ट, १९४९ मधील कलम ९ ए (२) (बी) व कलम २६ (बी) मध्ये सुधारणा करणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री. सुनिल तटकरे,** किरण पावसकर, नरेंद्र पाटील, आनंद ठाकूर, हेमंत टकले, धनंजय मुंडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त राज्य शासनामार्फत विविध कार्यक्रम हाती घेण्यात आलेले असणे, महाड जिल्हा रायगड येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक असणे, सन १९९६-९७ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांचे हस्ते या स्मारकाचे भूमिपूजन झालेले असणे, स्मारकासाठी तत्कालीन सरकारने रुपये ८ कोटी निधी मंजूर करून त्यामध्ये वाचनालय, नाट्यगृह, अभ्यासिका, ऑडीटोरीयम, तरंग तलाव व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा इत्यादी बाबींसाठी खर्च करण्याचे नमुद केले असणे, सद्यस्थितीत राष्ट्रीय स्मारकाची वास्तु पुर्ण झाली असून अनेक बाबी अपूर्ण असणे, ऑडीटोरियम व तरंग तलाव गेल्या पाच वर्षापासून बंद असणे, या स्मारकाची देखभाल व दुरुस्ती बार्टी संस्था पुणे यांच्याकडे असणे, सदरच्या स्मारकाची देखभाल पुणे येथील बार्टी संस्थेकडे असल्याने त्यांचे पुणे येथून व्यवस्थित सनियंत्रण न झाल्याने स्मारकाची दुरावस्था झाल्याचे स्थानिकांचे मत असणे, या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्था किंवा नगरपालिका प्रशासन किंवा नगरपालिका यांच्याकडे हे स्मारक हस्तांतरीत करण्याविषयी काही

नागरिकांनी व स्वयंसेवी संस्थांनी शासनास निवेदनाद्वारे विनंती कलेली असणे, या हस्तांतरणाविषयी अद्याप कोणतीच कार्यवाही न झाल्याने व दिवसेंदिवस स्मारकाची दुरावस्था होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेला प्रचंड असंतोष, या प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही."

पाच : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).

- मध्यंतर -

सहा : शासकीय विधेयके -

(क) विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे -

"सन २०१६ चे वि.स.वि क्रमांक ३५ - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१६"

(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६"

(१) विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १२ सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.प्रकाश गजभिये, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे.

(१) "सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६"

(२) "सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व

पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६"

(३) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१६"**

(४) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३२ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विधेयक, २०१६"**

सात : **(मंगळवार, दिनांक २६ जुलै २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड. अनिल परब, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.गोपिकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, रविंद्र फाटक, गिरीशचंद्र व्यास, सुजितसिंह ठाकूर, विनायक मेटे, श्रीमती स्मिता वाघ, डॉ.अपूर्व हिरे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"राज्यात शासकीय रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे, गुणवत्तापूर्ण रुग्णसेवा पुरविणे, याबाबत विविध योजना राबविण्यात येणे, राज्यातील कोकण व डोंगराळ प्रदेशात तसेच आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये वॉक इन इंटरव्यूद्वारे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरणे सुरू करणे, गरोदर मातांना घर ते रुग्णालय व रुग्णालय ते घर जाण्यासाठी "वात्सल्य रुग्ण वाहिका" योजना कार्यान्वित करणे, दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ पासून महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजना कार्यान्वित करण्यात येणार असणे, त्याअंतर्गत आजारांची संख्या २७६ वरुन ११०० पर्यंत आणि खर्चाची दिड लाखांची मर्यादा दोन लाखांपर्यंत वाढविण्याचे प्रस्तावित असणे, दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ पासून बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजना कार्यान्वित करण्यात येणार असणे, कॉलेज ऑफ फिजिशियन ॲड सर्जन अंतर्गत राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करणे, कर्करोग टाळण्यासाठी तंबाखू सेवन नियंत्रण उपक्रम राबविण्यात येणे, राज्यभर जलयुक्त शिवार योजना राबविण्याचे शासनाचे धोरण पूर्णत्वाने फलद्रुप होणे, सद्य:स्थितीत शिवारे भरभरुन वाहत असल्याचे चित्र गावोगाव दिसून येणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

आठ : **अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

(१) **ॲड.राहूल नार्वेकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्याच्या तंत्रशिक्षण संचालनालयाने केलेल्या चौकशीत राज्यातील बहुतेक महाविद्यालयानी खोटी माहिती देऊन एआयसीटीईची फसवणूक करणे, खोटी माहिती देणाऱ्या महाविद्यालयाचे प्रमाण जवळपास ७० टक्क्यांवर असणे, एआयसीटीईने सन २००२ मध्ये सर्व महाविद्यालयांना त्रुटी दूर करण्यासाठी ६ वर्षाची मुदत देवूनही कोणतीही सुधारणा न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.नरेंद्र पाटील, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"नवी मुंबईतील जुईनगर ते सानपाडा या दोन रेल्वे स्थानकांच्या मध्यभागी रेल्वे रुळालगत असलेल्या भूखंडावर डेब्रिज माफियांनी अतिक्रमण करुन तेथे डम्पिंग ग्राऊंड बनविले असल्याने सदर परिसरातील नागरिकांना दुर्गंधी व साथीच्या रोगांचा सामना करावा लागत असणे, तसेच शासनाचेही याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २६ जुलै, २०१६.

उत्तमसिंग चव्हाण,
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.